



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784









वर्ष ३ रे अंक : १८१ वा मंगळवार दि ०२ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# अखेर अविनाश कोठाळेंवर उगारला गेला चौकशीचा बडगा...

## ७३सीए नुसार होणार गैरव्यवहारांची चौकशी, सहायक निबंधक करणार चौकशी




**जनसंचलन/ बुलढाणा**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावती या संस्थेत आजवर केलेल्या बेबंद भ्रष्टाचार व गैरव्यवहार प्रकरणी अखेर बँकेचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे यांच्यावर चौकशीचा बडगा उगारला गेला असून, सहायक निबंधक अमरावती आता कोठाळे यांनी जे काही गैरव्यवहार केलेले आहेत, त्याची चौकशी ७३ सीए नुसार करणार आहेत. त्यासंदर्भातील एक पत्र दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या हाती लागले असून, यापुढील काळात तरी कोठाळेंवर योग्य ती कायदेशीर कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिजाऊ कमर्शियल को-ऑप. अमरावती बँकेत गेल्या अनेक दशकांपासून महाभ्रष्टाचारी अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे व त्यांचे काही लुटारू संचालक बेबंदपणे भ्रष्टाचार व गैरव्यवहार करीत आहेत. यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यापूर्वी एक मोठी वृत्तमालिका प्रकाशित केली आहे. या वृत्तमालिकेतून आम्ही कोठाळेंनी आजवर केलेल्या विविध प्रकारच्या गैरव्यवहारांवर प्रकाश टाकून कोठाळेंच्या भ्रष्ट प्रवृत्तीचा पर्दाफाश केला आहे. परंतु तरीही कोठाळे हे अनेक गैरप्रकार करून आपल्या पदावर कायम टिकून आहेत.कोठाळे यांच्या भ्रष्टाचारा विरोधात बँकेचे काही माजी संचालक व जागरुक नागरिक सातत्याने चौकशीची मागणी करीत होते. यापैकी स्वप्नील देशणुख यांनी काही दिवसांपूर्वी जी तक्रार संबंधित विभागाकडे केली होती, त्या तक्रारीची व दिलेल्या पुराव्यांची दखल घेऊन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांनी कोठाळेंची चौकशी करण्यासाठी सहकार विभागाकडून चौकशी अधिकारी म्हणून सहायक निबंधकांना चौकशीसाठी नियुक्त केले आहे.अविनाश कोठाळे हे बँकेचे अध्यक्ष असताना आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करून बुपासो कंपनीला विशेष लाभ प्राप्त करून दिला, अशी तक्रार स्वप्नील देशमुख यांनी केली होती. या संपूर्ण तक्रारीची सखोल चौकशी आता सहायक निबंधक अनिरुद्ध राऊत हे करणार आहेत. तक्रारकर्त्यांचा आरोप आहे की, कोठाळे यांनी आपल्या पदाचा व अधिकारांचा दुरुपोयग करून खासगी कंपनीला लाभ प्राप्त करून दिला, त्यात बँकेचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे आपल्या अधिकारांचा दुरुपयोग केल्याबद्दल कोठाळे यांचे अध्यक्ष व संचालक पद तथा बँकेचे प्राथमिक सदस्यत्व रद्द करावे, अशी मागणी केलेली आहे. या संपूर्ण तक्रारीची चौकशी आता सहायक निबंधक करतील व योग्य तो निर्णय घेतील. परंतु दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजकडे आजवर जे काही पुरावे आलेले आहेत, त्यामध्ये हे स्पष्टपणे दिसून येते की, अविनाश कोठाळे व त्यांच्या संचालकांनी गेल्या अनेक वर्षांपासून बँकेत प्रचंड गैरव्यवहार, नियमबाह्य कामे आणि आर्थिक भ्रष्टाचार केलेला आहे. त्यांनी बँकेला चुना लावत स्वत:च्या तुंबड्या भरण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे कोठाळेंच्या केवळ एकाच घोटाळ्याची नव्हे तर त्यांच्या सर्वच घोटाळ्यांची चौकशी करण्यात यावी, तसेच त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आम्ही या निमित्ताने करीत आहोत. कोठाळेंसारख्या भ्रष्टाचा-यांमुळे बँक आज डबघाईला येत आहे. त्यामुळे बँकेचे ग्राहक, भागधारक, ठेवीदार या सर्वांच्या हितासाठी तात्काळ कोठाळे व त्यांच्या सर्व संचालकांना बरखास्त करून बँकेवर प्रशासक नेमावा व सर्वच भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची चौकशी करण्याची गरज आहे. जोपर्यंत अशाप्रकारची कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज भ्रष्टाचा-यांच्या विरोधात आवाज उठवत राहणार आहे.


अजून बरेच काही पुढील भागात...


# मराठ्यांच्या आंदोलनाला ऐतिहासिक यश मिळणार?

**वृत्तसंस्था/मुंबई**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावं, या मागणीसाठी सुरू असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला दिवसेंदिवस व्यापक पाठिंबा मिळू लागला आहे. या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी सरकारी पातळीवर जोरदार हालचाली सुरू असून सरकारकडून जरांगे यांना देण्यासाठी एक प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आहे. याबाबतचा मसुदा जवळपास निश्चित झाले असून गावातील नातेवाईक आणि कुणबी प्रमाणपत्रधारकांनी दिलेल्या प्रतिज्ञाच्या आधारावर इतरांना कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबतचा विचार सरकारकडून सुरू असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कुणबी नोंदींच्या पडताळणीसाठी ग्रामपंचायत आणि तालुका स्तरावर नवी पडताळणी समिती स्थापन केली जाण्याची शक्यता आहे. नव्याने स्थापित होणारी पडताळणी समिती गावपातळीवरील नोंदी शोधणार आहे. त्यामुळे मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र मिळणं सोपं होणार आहे. हैदराबाद गॅझेटमध्ये केवळ लोकसंख्या नमूद असल्याने ते जसंच्या तसं लागू करता येणार नाही. भटक्या व विमुक्त जातींतील लोकांना जातींची प्रमाणपत्रे देताना बऱ्याच अडचणी येत होत्या. त्यावर मार्ग काढण्यासाठी ग्रामसेवकांच्या पातळीवर गृहचौकशी करून, त्यांना प्रमाणपत्रे देण्याबाबत २००८ मध्ये शासन आदेश (जीआर) काढण्यात आला होता. त्याच धर्तीवर मराठा समाजाला कुणबीचा दाखला देताना गृहचौकशी करून मग प्रमाणपत्र देता येईल का, यावर सरकार पातळीवर गंभीर चर्चा सुरू आहे. त्यानुसार कच्चा मसुदा तयार करून आठवडा अखेरपर्यंत त्यास अंतिम स्वरूप दिले जाणार असल्याचे खात्रीलायक सूत्रांकडून समजते. मागासवर्गीय जातींना प्रमाणपत्रे देण्याबाबत २००१ मध्ये एक जीआर काढण्यात आला होता. मात्र, त्यात भटक्या विमुक्त जातींना प्रमाणपत्रे देताना अडचणी येत होत्या. हा समाज भटकंती करणारा असल्याने प्रमाणपत्रे देताना या अडचणी येत होत्या. त्यावर तोडगा काढताना २००८ मध्ये पुन्हा एक नवा जीआर काढण्यात आला. नव्या जीआरनुसार भटक्या व विमुक्त जातींच्या नागरिकांची ग्रामसेवकाच्या पातळीवर गृहचौकशी करण्याचे ठरले. या चौकशीनंतर त्यांना प्रमाणपत्रे देण्याबाबतचा निर्णय नव्या जीआरमध्ये अंतर्भूत केला होता. दरम्यान, मराठा समाजालाही ओबीसींचे प्रमाणपत्र देताना नोंदी आढळून येत नसल्याच्या अडचणी आहेत. त्यामुळे राज्य सरकारने आता २००८ च्या जीआरच्या धर्तीवर मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्रे देता येतील का, याची चाचपणी सुरू केली आहे. गृहचौकशी करताना संबंधित नागरिक कष्टकरी, शेतकरी, मोलमजुरी करणारे आहेत का, याची गृहचौकशी करण्यात येईल. त्याचा अहवाल सक्षम अधिकाऱ्यांना दिला जाईल.

# ...शहरांमधील भयाच्या सावल्या...

## संपादकीय लेख

आपल्या शहरात राहणे, वावरणे सहज आणि सुरक्षित वाटायला हवे, ही जगात कोणत्याही शहरात राहणाऱ्या नागरिकाची अगदीच प्राथमिक अपेक्षा असणे स्वाभाविक आहे; पण भारतीय शहरांमध्ये राहणाऱ्या सर्व महिलांची मात्र ही भावना नाही. तब्बल ४० टक्के महिलांना त्यांची शहरे सुरक्षित वाटत नाहीत, हे धक्कादायक वास्तव ङ्महिला सुरक्षेवरील राष्ट्रीय वार्षिक अहवाल आणि निर्देशांक () २०२५फ मधून समोर आले आहे. देशातील ३१ महत्त्वाच्या शहरांमधील १२,७७० महिलांचे सर्वेक्षण करून काढलेले हे निष्कर्ष आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी हा अहवाल जाहीर करताना केलेले वक्तव्य महत्त्वाचे आहे. त्या म्हणतात त्याप्रमाणे, महिलांची सुरक्षा हा केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नाही तर स्त्रीच्या जगण्याच्या प्रत्येक पैलूवर परिणाम करणारा मुद्दा आहे. त्यामध्ये शिक्षण, आरोग्य, कामाच्या संधी, वावरण्याचे स्वातंत्र्य या सर्व गोष्टी येतात. ६० टक्के महिलांच्या मनातील सुरक्षित असल्याची भावना आणि अन्य ४० टक्के महिलांना वाटणारे असुरक्षिततेचे भय यांतील मोठे अंतर पार करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. या सर्वेक्षणात समोर आलेली सगळ्यांत महत्त्वाची बाब म्हणजे सूर्यास्तानंतरची स्थिती. रात्रीच्या वेळी मनोरंजनाची ठिकाणे आणि सार्वजनिक वाहतुकीची साधने वापरताना बहुतांश महिलांना असुरक्षित वाटते. आयटी उद्योग, वैद्यकीय क्षेत्र, माध्यमे, मनोरंजन, हॉटेले यांसह अनेक क्षेत्रांत महिलांना रात्री काम करावे लागणे ही आता सामान्य बाब झाली आहे. बहुतांश महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वाटते, ही समाधानकारक बाब असली तरी घरी परतण्याची वाटही तेवढीच सुरक्षित असावी, हे मात्र अद्याप घडलेले नाही. महिलांना जी शहरे सुरक्षित वाटतात, त्यात राज्याची राजधानी मुंबई अग्रक्रमावर आहे; याचे कारण मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकल ट्रेनमध्ये महिलांच्या डब्यात आणि रेल्वे स्थानकांवर रात्रीच्या वेळी असलेली पोलिसांची उपस्थिती. मध्यरात्रीनंतरही महिलांच्या डब्यांत निर्धास्तपणे प्रवास करणाऱ्या महिला दिसतात, ते यामुळे. पाटणा, जयपूर, फरीदाबाद, दिल्ली, कोलकाता, श्रीनगर, रांची या असुरक्षित शहरांच्या यादीत राजधानी दिल्लीचे नाव असावे, ही केवळ देशाच्याच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर निश्चितच नाचक्कीची बाब. शहरांतील ९१ टक्के महिलांना कामाची ठिकाणे सुरक्षित वाटतात, हे दिलासादायक आहे, पण त्यापैकी जवळपास अर्ध्या महिलांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरोधात कायदा (पॉश) आहे याची जाणीवच नसावी, हे अत्यंत निराशाजनक आहे. या कायद्याबाबत पुरेशी जाणीवजागृती करूनही शिकलेल्या आणि कमावत्या महिलांना याची किमान



माहितीही नाही, हे केवळ खेदजनकच नव्हे तर बेजबाबदारपणाचे आहे. ज्या महिलांना या कायद्याबद्दल माहिती होती, त्यांनीही अशा तक्रारींची दखल घेतली जाईल याबद्दल साशंक असणे, हेही चिंताजनक आहे. सध्याची यंत्रणा अशा तक्रारींची दखल घेण्यात संपूर्ण अपयशी झाल्याचे ३० टक्के महिलांचे मत आहे. सार्वजनिक वाहतुकीत महिला पोलिसांची उपस्थिती असते. अनेक शहरांमध्ये ॲप आधारित टॅक्सीसेवांत महिला चालक आहेत. अनेक राज्यांमध्ये आता पोलिस दलात ३३ टक्के महिला आहेत. त्यांच्या सार्वजनिक ठिकाणी गणवेशातील उपस्थितीनेही बराच फरक पडतो. गेल्या काही वर्षांमध्ये शहरांमध्ये सीसीटीव्हीही मोठ्या प्रमाणात लावले गेले आहेत, महिलांना त्वरित मदत मिळावी म्हणून वेगवेगळ्या हेल्पलाइन असतात; मात्र, या हेल्पलाइनचा वापर नेमका किती केला जातो आणि केल्यास त्यावर किती त्वरेने प्रतिसाद मिळतो, याचेही देशव्यापी सर्वेक्षण होण्याची गरज आहे. या सर्वेक्षणाचे प्राधान्य शारीरिक सुरक्षेला आहे. पण महिलांना मानसिक, आर्थिक आणि डिजिटल सुरक्षाही हवी आहे. घर आणि कामाच्या ठिकाणी होणारा मानसिक छळ, वेतनातील स्त्री-पुरुष भेदभाव आणि आजच्या युगाचा मंत्र असलेल्या सायबर स्पेस यांमध्येही महिलांना सुरक्षा हवी आहे. ही जबाबदारी सरकारवर टाकून मोकळे होता येणार नाही. लैंगिक समानतेवर विश्वास ठेवणारा आणि तसे वागणारा समाज म्हणून आपण कुठे आहोत, याचे आत्मपरीक्षणही गरजेचे आहे. महिलांना समान अधिकार आणि स्वातंत्र्य देणाऱ्या ईशान्य भारतातील कोहिमा, ऐजॉल, गंगटोक, इटानगर ही छोटी शहरे सुरक्षित शहरांच्या यादीत अग्रक्रमावर आहेत, हे पुरेसे बोलके आहे.




## जिल्हा शिक्षक गौरव पुरस्कारासाठी २१ प्रस्ताव

**जनसंचलन/बुलढाणा**

शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या जिल्हा शिक्षक गौरव पुरस्कारासाठी गुरुवारी २१ शिक्षकांची मुलाखत प्रक्रिया संपन्न झाली. यामध्ये १८ प्राथमिक तर ३ माध्यमिक शिक्षकांचा समावेश आहे. ही मुलाखत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष गुलाब खरात यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, तसेच समितीचे सदस्यसचिव व प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील उपस्थित होते. बुलढाणा जिल्हा परिषद अंतर्गत एकूण १,३९४ प्राथमिक आणि ३७ माध्यमिक अशा १,४३१ शाळा आहेत. या शाळांमधील सुमारे साडेसहा हजार शिक्षक अध्यापन कार्य बजावतात. दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त प्रभावी शैक्षणिक कार्य करणाऱ्या शिक्षकांचा जिल्हा शिक्षक गौरव पुरस्कार देऊन गौरव केला जातो. यासाठी यंदा जिल्ह्यातील १३ तालुक्यांमधून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचे प्रस्ताव मागवण्यात आले होते.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# भारताचे मजबूत बाहू युवा



युवा हा कोणत्याही देशाच्या प्रगतीसाठी पारंपरिक ते आधुनिक असा बदल घडवणारा महत्वाचा दुवा असतो. कारण जगाच्या कोप-यात कुठेही होणारा बदल हा प्रामुख्याने युवा वर्गाला केंद्रस्थानी ठेवून केला जातो. मग तो बदल शिक्षण, संगीत, विज्ञान, खेळ, मनोरंजन इत्यादी कुठल्याही प्रकारातला असो. भविष्यातील भारताविषयी सर्वांच्याच काही ना काही कल्पना आहेत, मात्र त्या प्रत्यक्षात आणणारे मजबूत बाहू हे युवाच आहेत.

सध्या भारताला प्रगतिपथावर नेण्याच्या गोष्टी सुरू आहेत. त्यासाठी बरेच मार्ग, उपाय अवलंबले जात आहेत. या सर्व प्रयत्नांची दोरी आजच्या तरुणाच्या हाती आहे. आज एखाद्या तरुणाच्या डोळ्यांत त्याचं भविष्य घडवण्याची स्वप्नं तरळत असतील, तर त्याला आधुनिक नितीशास्त्र व नियमांवर विश्वास ठेवून ते अवलंबण्याखेरीज मार्ग नसतो. अखेर त्याला जीवनात यश पाहिजे असतं; परंतु हल्लीच्या काळात जोपर्यंत तरुणाईच्या पसंतीस एखादी गोष्ट उतरत नाही तोपर्यंत ती प्रसिद्ध किंवा यशस्वी होऊ शकत नाही. हा आत्ताच्या बाजारू जगाचा सक्सेस फॉम्युर्ला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त तरुणाईचा विचारही जिथे प्रसिद्धी, तिथे यश, असाच झाला आहे.

हीच तरुणाई देशाला पुढे घेऊन जात असते. तरुणांचे हे विचार किंवा त्यांच्या विचारांमधील बदल एखाद्या देशाला विकसनशील असण्यापासून ते विकसित देश अशा पदवीपर्यंत नेऊ शकतात का? तसं घडत नसेल तर त्याची कारणं काय आहेत ते बघू या. जगाचा विचार करण्यापेक्षा आपल्या विकसनशील भारत देशातलंच आपण पाहू. लोकसंख्येच्या मानाने जगात सगळ्यात जास्त तरुणाई ही आपल्या भारत देशात आहे. भारताच्या विकासात सगळ्यात मोठा सहभाग हा तरुणाईचा आहे. तरुणांना योग्य संधी देणारा, त्यांच्या गरजा पूर्ण करून त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देणारा देश हा प्रगतिपथावर नेहमी आगेकूच करत राहतो. भारतातही तरुणांची परिस्थिती गेल्या दशकापासून सुधारत चालली आहे. पण तरीही अशा काही गोष्टी किंवा गरजा आहेत ज्या लवकरात लवकर पूर्ण व्हायला हव्यात.

आपल्या देशाच्या बाबतीत म्हणायला गेलं तर परिस्थिती सुधारणारी असली तरी अजूनही भारतात ब-याच भागांमध्ये तरुण पिढी घडण्यासाठी पाया असलेली शिक्षण ही मूलभूत गरजसुद्धा पूर्ण होत नाही.


शहरं आणि आसपासच्या परिसराच्या मानाने गावांमध्ये शिक्षणातली जागरूकता जसजशी कमी होत जाते तसा अशिक्षितपणा वाढत जातो आणि हा प्रगतीच्या मार्गावरचा स्वातंत्र्योत्तर काळातला सगळ्यांत मोठा अडथळा आहे. कारण काही वेळा आवड असूनही गरिबी किंवा तत्सम कारणामुळे नाहीतर मुळातच आवड नसल्याने शिक्षणाची साथ तरुणपणातच सुटते. तसेच मुलगा आणि मुलगी हा भेदभाव आहे, जात-पात, अंधश्रद्धा यासारख्या अनेक परिस्थितीजन्य गोष्टींमुळे शिक्षणावर येणा-या बंदीला आळा बसला पाहिजे. पुढे उच्चशिक्षणाच्या बाबतीतही हाच प्रकार आहे. स्वदेशाबद्दल कितीही अभिमान असला तरी शिक्षणपद्धती आणि अभ्यासक्रम सतत अपडेटेड होत असल्याने कितीही खर्च करावा लागला तरी अनेक जण पदवीनंतर उच्चशिक्षणासाठी भारताबाहेरच्या विकसित देशात जाण्याचा मार्ग अवलंबतात.

कारण त्या देशांमध्ये प्रात्यक्षिकांवर जास्त भर दिला जातो, ज्यामुळे नेहमी नवीन ज्ञान तर मिळतच राहतं, शिवाय स्वत:ला स्वत:हून नेहमी अपडेट ठेवता येतं. त्यामुळे ते ज्ञान केवळ पुस्तकी आणि परीक्षा देण्यापुरतं न राहता आयुष्यात भर टाकणारं होतं. अशी परिस्थिती म्हणावी तितकी भारतात विद्यार्थ्यांना उपलब्ध नाही. स्वातंत्र्यानंतर इतक्या वर्षानीसुद्धा आपल्या शिक्षणपद्धतीत ब-यापैकी भर हा थिअरीवरच राहिलेला आहे; परंतु असं असलं तरी पिढ्यांमध्ये काळानुरूप बराच बौद्धिक बदल झाला आहे. त्यामुळे आजच्या या फास्ट फॉरवर्ड आणि हार्डवर्कपेक्षा स्मार्टवर्कवर विश्वास ठेवणा-या पिढीला अपेक्षेप्रमाणे प्रात्यक्षिक ज्ञान शैक्षणिक वयात मिळत नसल्याने, केवळ परीक्षेपुरती तयारी केली म्हणजे अभ्यास झाला हा विचार दृढ होऊन आपोआपच त्याबद्दल निष्काळजीपणा तयार होत जातो. आणि जेव्हा ते ज्ञान असलेल्यांना ते वापरण्याची वेळ येते तेव्हा यश येत नाही. एकूणच फक्त मार्क मिळवण्याची स्पर्धा असलेल्या या शिक्षणाचा फारसा उपयोग होत नाही!

तसंच, विकसित देशात १-२ वर्ष राहून शिक्षण घेऊन नोकरी किंवा रोजगारासाठी पुन्हा एका विकसनशील देशात येणं हे केवळ भावनिकदृष्ट्या योग्य वाटू शकतं, प्रॅक्टिकली नाही. त्यामुळे तरुणांना जर भारतात प्राथमिक आणि उच्चशिक्षणाच्या आधुनिक आणि सहज उपलब्ध होणा-या संधी दिल्या, तर देशातली ब-यापैकी तरुणाई ही देशात राहूनच उच्च आणि आपल्या आवडीचं शिक्षण घेणं पसंत करतील. तसंच या तरुण वर्गासाठी भारतीय किंवा भारतातल्या उद्योगधंद्यांमध्ये नोकरी मिळाल्यास देशात येणारी संपत्ती ही देशातच राहू शकते आणि ब्रेन ड्रेनही घडणार नाही.

ज्या तरुण वर्गाला स्वत: व्यवसाय करण्याची इच्छा आहे त्यांना प्रोत्साहनपर भांडवल सुरुवातीच्या काही काळात सहजपणे उपलब्ध झाल्यास त्यांना व्यवसायाच्या बांधणीवर जास्त लक्ष देता येऊन, शिवाय भांडवलाअभावी त्यांचे मानसिक खच्चीकरणदेखील होणार नाही. भारताला प्रगतिपथावर नेण्यासाठी तरुणांना जास्त प्रोत्साहन देण्यासाठी विचार झाला पाहिजे. त्यामुळे आधुनिकतेकडे झेप घेण्याची क्षमता असलेल्या आपल्या तरुणाईला या संधी देशातच मिळत राहिल्या तर ते अशा संधींचं सोनं नक्कीच जास्तीत जास्त करतील.

# कर्कश आवाजाने घटतेय मुलांची ऐकण्याची क्षमता



चांगल्या आरोग्यासाठी आहाराएवढीच झोपेचीसुद्धा असते आवश्यकता इअरफोनबाबत पीजीआयएफ संस्थेत अभ्यास : साठ डेसिबलपेक्षा जास्त आवाज धोयाचा, थोडा ब्रेक आवश्यक इअरफोन लावून दीर्घकाळ जोरात आवाजात संगीत ऐकण्यामुळे मुले आणि युवकांची श्रवणक्षमता कमी होऊ लागली आहे. कर्णविकारतज्ज्ञांनी केलेल्या एका अभ्यासातून ही माहिती मिळाली.ऐकू कमी येत असल्यामुळे मुलांना शाळेत शिक्षक काय सांगत आहेत हे लवकर कळत नाही. त्याचा परिणाम म्हणजे ही मुले अभ्यासात मागे पडायला लागली आहेत. या शिक्षकांनी पालकांना त्याबाबत सांगितल्यावर पालकांनी मुलांना कान-नाक-घसा तज्ज्ञांकडे नेले तेव्हा या मुलांच्या श्रवणक्षमतेवर परिणाम झाल्याचे समोर आले. मुलांना हा त्रास का होतो आहे याचा अभ्यास पोस्टग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्चफ (पीजीआय) या संस्थेने केल्यावर इअरफोन लावून दीर्घकाळ जोरात आवाजात संगीत ऐकण्यामुळे श्रवणक्षमतेवर परिणाम होत असल्याचे स्पष्ट झाले.

कोरोना काळाचा परिणाम पीजीआयएफमधील चेतासंस्थाविषयक विकारांचे तज्ज्ञ (न्यूरॉलॉजिस्ट) डॉ. अमित केशरी म्हणाले, कोरोना काळात मुले दीर्घकाळ घरात होती. ऑनलाइन वर्ग, मोबाइल फोनवरून बोलणे आणि गाणी ऐकण्यासाठी मुलांनी इअरफोनचा खूप वापर केल्याचा हा परिणाम आहे. पालकांकडून ही माहिती मिळाली.कानांची तपासणी केली तेव्हा मुलांच्या श्रवणक्षमतेवर परिणाम झाल्याचे दिसून आले.फ १५ मिनिटांचा ब्रेक घ्या दीर्घकाळ इअरफोन किंवा इअरबड्स वापरल्यामुळे कानांतील मेणसदृश पदार्थ (इअर वॅस) कानांच्या आत जातो आणि त्याला बाहेर येण्याचा मार्ग नसल्यामुळे वेदना होऊ लागतात. ऐकू कमी येण्याचा त्रास असलेल्यांनी दीर्घकाळ जोरात आवाजात संगीत ऐकणे टाळायला हवे. गाणी-संगीत ऐकताना मध्येच १५ मिनिटांचा ब्रेक घ्यावा आणि उत्तम दर्जाचे इअरफोन वापरा, असा सल्ला डॉटरांनी दिला आहे.९० डेसिबलवरील आवाज धोकादायक मानवी कान अत्यंत संवेदनशील असल्यामुळे कर्कश आवाज त्यांना धोयाचे असतात. ९० डेसिबलपेक्षा जास्त तीव्र आवाज ऐकू नये. त्यापेक्षा जास्त आवाज दीर्घकाळ ऐकत राहण्यामुळे श्रवणक्षमता हळूहळू कमी होत जाते. बहुतेक मुले मोबाइल फोन किंवा टीव्हीवर मोठ्या आवाजात संगीत ऐकतात. डीजे आणि पबमधील आवाज १२० डेसिबल आवाज असतो आणि कानांसाठी तो धोयाचा ठरतो. कर्कश आवाजाच्या स्पीकरपुढे खूप काळ असलेल्या तरुणांची श्रवणक्षमताही कमी होत असल्याचे डॉ. अमित केशरी यांनी नमूद केले.कर्णयंत्र हा अखेरचा उपाय साठ डेसिबलपेक्षा जास्त आवाजच ऐकू येत असतील तर अशी मुले आणि प्रौढांना कर्णयंत्र (हिअरिंग एड) हाच मार्ग राहतो, असे डॉ. केशरी यांनी सांगितले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भिंतीवरील सरपटणाऱ्या किळसवाण्या पाली व झुरळे क्षणात सोडतील घर, फक्त करा हा उपाय

कधीकधी, बाथरूममध्ये पाली पाहिल्यानंतर, आत पाऊल ठेवायलाही भीती वाटते. लोकांच्या मनात हा विचार अनेकदा येतो की जर आंघोळ करताना भिंतीला चिकटलेला पाली आपल्यावर पडला तर? पालीच्या विष्ठेमध्ये आणि लाळेमध्ये साल्मोनेला नावाचा बॅक्टेरिया आढळतो, ज्यामुळे अन्नातून विषबाधा होऊ शकते. त्याच वेळी, जर हा प्राणी अन्नात पडला तर अन्न विषारी बनते आणि ते खाल्ल्याने एखाद्याचा मृत्यू देखील होऊ शकतो. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला तुमच्या घरातून सरडे हाकलायचे असतील तर तुम्ही खाली दिलेल्या काही सोप्या पद्धती अवलंबू शकता.पाली अनेकदा घरात त्रास निर्माण करतात. बरेच लोक त्यांना दूर करण्यासाठी रासायनिक फवारण्या किंवा इतर




विषारी उपायांचा वापर करतात, जे आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. पण जर तुम्ही नैसर्गिक आणि सुरक्षित मार्ग शोधत असाल तर तुमच्या स्वयंपाकघरात असलेले काही मसाले तुम्हाला मदत करू शकतात. हे केवळ पाली दूर ठेवत नाहीत तर घरात एक ताजा सुगंध देखील ठेवतात. पाली पळवण्यासाठी या मसाल्यांचा वापर कसा करायचा ते जाणून घेऊया.अंड्याचे कवच तुम्हाला पाली पळवून लावण्यास मदत करू शकतात. खरंतर पाली अंड्याच्या कवचापासून पळून जातात. अशा परिस्थितीत, ही साले अशा ठिकाणी ठेवा जिथे पाली जास्त दिसतात. असे केल्याने तुम्ही सरड्यांपासून मुक्त होऊ शकता.

### हिंगाचा वापर

पालींना हिंगाचा तीव्र वास आवडत नाही. ते वापरण्यासाठी, एका वाटी पाण्यात अर्धा चमचा हिंग मिसळा आणि स्प्रे बाटलीत भरा. हे मिश्रण पालींच्या लपण्याच्या ठिकाणी आणि कोपऱ्यात शिंपडा. काही दिवसांतच पाली घराबाहेर पडतील.

### पेपर स्प्रे त्याचा परिणाम दाखवेल

पाली बहुतेकदा घरांच्या छतावर आढळतात. अशा परिस्थितीत तुम्ही पेपर स्प्रेची मदत घेऊ शकता. यासाठी, एका स्प्रे बाटलीत पाणी भरा आणि त्यात काळी मिरी घाला. आता पुढच्या वेळी जेव्हा तुम्हाला छतावर कुठेही पाली घिरट्या घालताना दिसेल तेव्हा लगेच त्याच्या शरीरावर हा स्प्रे स्प्रे करा. असे केल्याने तुम्हाला तुमच्या घरात पुन्हा कधीही सरडा दिसणार नाही.

### कांद्यात लसूण मिसळून स्प्रे बनवा

यासाठी कांदा आणि लसूण रस एका स्प्रे बाटलीत भरा. आता त्यात थोडे पाणी घाला. पाणी आणि रस मिसळण्यासाठी बाटली चांगली हलवा. आता ते घराच्या प्रत्येक कोपऱ्यात शिंपडा. असे केल्यानंतरही पाली पळून जातात.

### कांद्यापासून पळून जातात


पाली पळवण्यासाठी, तुम्ही कांदा कापू शकता, तो धाग्याने बांधू शकता आणि भिंतीवर लटकवू शकता. कांद्यामध्ये सल्फरचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे त्याला तीव्र वास येतो. या दुर्गंधीमुळे पाली पळून जातो.

### नॅप्थालीन गोळ्या

पाली तुमच्या घरापासून दूर ठेवण्यासाठी तुम्ही कपड्यांपासून कीटकांना दूर ठेवणारे नॅप्थालीन बॉल्स देखील वापरू शकता. तुम्ही या गोळ्या कपाटाच्या वर ठेवू शकता. या गोळ्या कोणाच्या हाती लागू नये ही काळजी घ्या.

## रेखा अन् त्या अभिनेत्याचा रोमॅण्टिक सीन शूट करताना बंदूक घेऊन आलेले गावकरी, सेटवर झालेला राडा अन् मग...

**मुंबई-** बॉलिवूडच्या ज्येष्ठ अभिनेत्री रेखा यांनी त्यांच्या अभिनय कारकिर्दीत अनेक उत्कृष्ट चित्रपट दिले आहेत, त्यापैकी एक १९८१ मध्ये प्रदर्शित झालेला उमराव जान होता, ज्यामुळे रेखा चित्रपटसृष्टीतील नवीन स्टार बनल्या. या चित्रपटात लोकप्रिय अभिनेता फारुख शेख देखील होते, त्यावेळी ते बॉलिवूडमध्ये स्वत:ला स्थावर करण्याचा प्रयत्न करत होते.



आत फारुख यांचा जन्मदिन आहे. फारुख यांनी त्यांच्या एका मुलाखतीत सांगितले होते की ते लखनौमधील एका घरात रेखासोबत एक इंटिमेट सीन शूट करत होते पण त्यादरम्यान रेखाचे अनेक चाहते बंदुका घेऊन तिथे पोहोचले. फारुख म्हणाले की, रेखांची एक झलक पाहण्यासाठी आणि शूटिंग सुरू असलेले सीन पाहण्यासाठी चाहत्यांची गर्दी सेटबाहेर जमली होती. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका जुन्या व्हिडिओमध्ये फारुख यांनी त्या घटनेची आठवण करून देताना म्हटले होते की, चाहत्यांचा उत्साह खूप वेगाने वाढला होता. अनेक लोक त्यांच्यासोबत बंदुका घेऊन आले होते आणि सेटवर नुसता गोंधळ उडाला होता. बंदूक पाहून क्रू मेंबर्स आणि दिग्दर्शक मुझफ्फर अलीसुद्धा घाबरले, त्यांना सर्वांच्या सुरक्षिततेची भीती वाटत होती. त्यांनी सांगितले की, कलाकार आणि कॅमेरा क्रू दोघांनाही घराच्या छोट्या खोल्यांमध्ये बसणे कठीण झाले होते, तर दुसरीकडे शूटिंग पाहण्यासाठी आलेल्या लोकांच्या गर्दीमुळे अडचणी आणखी वाढल्या होत्या. फारुखने सांगितले की रेखासोबत एक रोमँटिक सीन शूट केला जात असल्याची बातमी जवळच्या गावांमध्ये पसरली, त्यामुळे शूटिंग पाहण्यासाठी गर्दी जमली.परिस्थिती इतकी गंभीर झाली की काही चाहते बंदुका घेऊन आले, ज्यामुळे वातावरण तापले. रेखा, फारुख आणि दिग्दर्शक मुझफ्फर अली यांच्यासह सर्व क्रू मेंबर्सना काळजी वाटत होती की कोणीतरी त्यांच्या बंदूकीतून गोळी झाडेल. तणाव असूनही, ते किती ताणतणावग्रस्त आहे हे न दाखवता, त्यांनी आपला संयम आणि व्यावसायिकता राखून तो सीन पूर्ण करण्यात यश मिळवले. व्हिडिओमध्ये फारुख यांनी रेखा यांचे वर्णन भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात टॅलेंटेड आणि ग्लॅमरस अभिनेत्रींपैकी एक असे केले आहे. रेखासोबत पडद्यावर रोमॅण्टिक करणाऱ्या मोजक्या पुरुषांपैकी ते एक होते, त्यामुळे त्यांच्या इंटिमेट सीन्समुळे लोक त्यांना तेव्हा चिडवूही लागले होते.

## सुनील शेट्टीचं प्रमोशन; आजोबांची ड्युटी लागू, अथियाने दिला गोडगोजिऱ्या चिमुकलीला जन्म...

**मुंबई -** सुनील शेट्टी हे बॉलिवूडचे सुपरस्टार असून त्यांनी अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलं आहे. त्यांनी हेरा फेरी, धडकन, भाई, बॉर्डर यांसारख्या अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये भूमिका साकारल्या आहेत. सुनील, २०२०मध्ये प्रदर्शित झालेल्या घनी या सिनेमामध्ये शेवटचे दिसले होते. सुनील शेट्टी यांची लेक अथिया शेट्टीने सुद्धा काही सिनेमांमध्ये काम केलं आहे. अशातच आता सुनील शेट्टी नुकतेच आजोबा झाले असून त्यांची लेक अथियाने गोंडस लेकीला जन्म दिला आहे. त्यामुळे, सुनील शेट्टी आजोबांची ड्युटी करण्यासाठी सज्ज आहेत. सुनील शेट्टी यांची लेक अथिया शेट्टीने २३ जानेवारी २०२३ मध्ये भारतीय क्रिकेटपटू केएल राहुलसोबत लग्नगाठ बांधली. लग्नाच्या दोन वर्षानंतर आथियाने गुडन्यूज दिली आहे. आज २४ मार्च २०२५ रोजी अथियाने मुलीला जन्म दिला आहे. सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत अथियाने ही आनंदाची बातमी तिच्या चाहत्यांसोबत शेअर केलीये. अभिनेत्रीने एक पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट शेअर करत कॅप्शनमध्ये लिहीलं की, आम्ही एका मुलीचे पालक झालो आहोत... अथियाची ही पोस्ट आता मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. ज्यावर चाहते आणि सेलिब्रिटी या जोडप्याचे अभिनंदन करत आहेत. त्यामुळे आता सुनील शेट्टी देखील नातीचं दणक्यात स्वागत करण्यासाठी तयार आहे. त्याचबरोबर लेकीच्या डिलिव्हरीपूर्वी सुनील शेट्टी यांनी महाकाल मंदिरात जाणून भगवान शंकराचं दर्शन घेतलं. त्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. इन्स्टाग्रामवर व्हायरल होत असलेल्या फोटोमध्ये सुनील शेट्टी हात जोडून उभे असून आणि भगवान शिवाची प्रार्थना करत असल्याचे दिसून येत आहे.अथियाच्या या पोस्टवर अभिनेत्री कियारा अडवाणीनेही कमेंट केली. ज्यामध्ये तिने हार्ट ईमोजी शेअर केले आहेत. अर्जुन कपूरने लिहिलं, अभिनंदन मित्रांनो. याशिवाय पंजाबी गायक जस्सी गिलनेही या जोडप्याला शुभेच्छा दिल्या. अथियाच्या पोस्टला काही मिनिटांतच दोन लाखांहून अधिक लाईक्स मिळाले आहेत.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मृताच्या एका दानातून मिळू शकते नऊ गरजूंना नवजीवन




दानाचे महत्त्व फार मोठे आहे. अन्नदान, वस्त्रदान वगैरे त्याचे प्रकार आहेत. बदलत्या काळात अवयवदानसुद्धा त्यात आले असून, त्याचे प्रमाण वाढण्याची गरज मात्र आहे. एखाद्या गरजू व्यक्तीला हवे ते देण्याचे समाधान फार मोठे असल्याची जाणीव सर्वांना असते. पण, सध्या देशात लाखो लोक अवयवदात्यांच्या प्रतीक्षेत आहेत. कोणाला हृदय, कोणाला यकृत, कोणाला मूत्रपिंड, तर कोणाला डोळ्यांची गरज आहे. एका मृत व्यक्तीच्या अवयवदानातून किमान नऊ जणांना नवजीवन मिळते हे लक्षात घेतले, तर अवयवदान किती मोलाचे आहे हे लक्षात येईल. संकेतस्थळावरील माहितीनुसार, सध्या देशभरात सुमारे १,०६,००० लोक अवयवदात्यांच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसते.

अवयव मिळण्याच्या प्रतीक्षेत देशात दरवर्षी सुमारे पाच लाख लोक मरण पावतात. भारतात रस्ते अपघातांत दरवर्षी सुमारे दीड लाख लोक प्राण गमावतात आणि अशा घटनांत सर्वांत आधी मेंदूचे काम थांबते. अशा लोकांचे अवयव दान करता येत असले, तरी जेमतेम दोन ते तीन टक्के भाग्यवंतांनाच ते मिळतात.हे अवयव करता येतात दान...मृत व्यक्तीचे हृदय, फुफ्फुसे, यकृत, मूत्रपिंड, आतडी आणि स्वादुपिंड हे अवयव दान करता येतात. डोळ्यांच्या बाहुलीचा पारदर्शक पडदा हाडांतील नसा, मांसपेशी, स्नायूबंध, अस्थिबंधन, कूर्चा आणि हृदयाच्या झडपाही गरजू रुग्णाला उपयोगी पडतात. जिवंत व्यक्तीचे एक मूत्रपिंड आणि यकृताच्या काही भागाचेही दान करता येते. एका मूत्रपिंडावर दात्याला जगता येते आणि यकृताची वाढ होऊन ते पुन्हा पहिल्या आकारात येते. त्यामुळा दात्याला काही त्रास होत नाही.

अवयवदानाची प्रक्रिया : जिवंत व्यक्ती मूत्रपिंड किंवा यकृत देणार असेल, तर तिची आधी वैद्यकीय तपासणी केली जाते. मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी हे अवयव प्रत्यारोपणासाठी योग्य असल्याचे सांगितल्यावरच पुढील प्रक्रिया सुरू होते. दात्याच्या शरीरातील हे अवयव शस्त्रक्रियेद्वारे काढून घेऊन त्यांचे प्रत्यारोपण करेपर्यंत ते रसायनांत सुरक्षित ठेवले जातात. अवयवदात्याला काही महिन्यांपर्यंत वैद्यकीय निरीक्षणाखाली ठेवले जाते. मृत व्यक्तीच्या मेंदूने काम करणे पूर्णपणे थांबविले असल्याची खात्री आधी करून घेतली जाते. याबाबतच्या अहवालात ब्रेन स्टेम डेडफक्चे सत्यापन केले असेल, तर मृताच्या नातलगांची परवानगी घेतली जाईल. तोपर्यंत मृताला व्हेंटिलेटवर ठेवतात. कोणत्या रुग्णाला कोणता अवयव हवा आहे याबाबत प्रतीक्षा यादी तपासली जाऊन रुग्णाला सूचना देऊन संबंधित रुग्णालयात आणले जाऊन अवयव प्रत्यारोपण केले जाते.नंतर मृताचे पार्थिव नातलगांकडे दिले जाते.

अंतिम अनुमती : ब्रेन डेडघोषित केल्यानंतर प्रत्यारोपण करण्याबाबतचा निर्णय पूर्णपणे मृताचे निकटवर्तीय आणि नातलगांचा असतो.संबंधित व्यक्तीने जिवंत असताना आपल्या मृत्यूनंतर आपले अवयवदान करावे, असे जाहीर केले असले, तरी नातलगांनी अनुमती देईपर्यंत अवयवदान करता येत नाही. मेडिको लीगलप्रकरणांत अवयवदानापूर्वी पोलिसांच्या एनओसीफ्ची गरज असते. अवयवदानापूर्वी मृत्यूनंतरच्या औपचारिकता पूर्ण करण्यासाठी शरीर फॉरेन्सिक तज्ज्ञांकडे पाठविले जात,न डेडतरतूद : माणसाच्या मेंदूने प्रतिक्रिया देणे बंद करणे, मेंदूद्वारे संचलित होणाऱ्या सर्व क्रिया बंद होणे ही ब्रेन डेडची स्थिती असते. पण, व्हेंटिलेटरच्या माध्यमातून शरीरातील काही अवयव काही काळ जिवंत ठेवता येतात. पण, या स्थितीत पुन्हा जीवन मिळणे फार कठीण असते. त्यामुळे अवयव दानाच्या हेतूसाठी १९९४ मध्ये तयार करण्यात आलेल्या मानव अंग आणि ऊतक प्रत्यारोपण अधिनियमांतर्गत अवयवदान करणाऱ्या व्यक्तीचे ब्रेन डेडप्रमाणपत्र अनिवार्य असते. घरात किंवा अन्यत्र हृदयविकाराच्या झटयामुळे मरण पावलेली व्यक्ती अवयवदान करू शकत नाही. कारण, हृदयाचे काम थांबविल्यावर काही मिनिटांतच मृताच्या शरीरातील सर्व अवयव काम करणे बंद करतात आणि असे शरीर अवयवदानासाठी उपयोगी पडत नाही.रुग्णालयात मृत्यू झालेल्या आणि डॉटरांनी ब्रेन डेडप्रमाणित केले असेल, तर अशा व्यक्तीचे अवयव कृत्रिम माध्यमातून सक्रिय ठेवून त्यांचा उपयोग प्रत्यारोपणासाठी वापर करता येतो. कृत्रिमरीत्या सक्रिय ठेवलेले अवयव विशिष्ट कालावधीत वापरावे लागतात. त्यात मृत व्यक्तीचे हृदय आणि फुफ्फुसे चार ते सहा तासांच्या आत, यकृत सहा ते बारा तासांत, मूत्रपिंड ३० तासांत आणि स्वादुपिंड सहा तासांच्या आता वापरावे लागते.

अवयवदानाबद्दल मृताच्या नातलगांना काहीही पैसे दिले जात नाहीत, तसेच रुग्णाकडूनही काही पैसे घेतले जात नाहीत. अवयवदान करणे, अवयव काढून घेऊन पुन्हा शस्त्रक्रिया करण्याचा खर्च रुग्णालयेच करतात.

# बसल्याजागी व्यायाम करून घ्या

बहुतेकजण व्यायाम करण्याचे ठरवतात; पण आळसापोटी रोज टाळत असतात. पण, आता असे करण्याचे कारण नाही. काही व्यायाम बसून सहजतेने करता येऊ शकतात.हे सोपेही आहेत व परिणामकारकही.

खांदे व मानदुखीपासून आराम : खुर्ची वा स्टुलावर आरामात बसा. दोन्ही तळहात खांद्यांवर ठेवा. या स्थितीत डावीकडे व उजवीकडे वळा.आता १ मिनीट सतत अशाप्रकारे डावीउजवीकडे वळत राहावे. नियमितपणे हा व्यायाम केल्यास खांदे व मानदुखीपासून आराम मिळतो. तसेच, ब्राउन फॅटसेल्सही सक्रिय होतात व कंबरेजवळील चरबीही कमी होते.

पोश्चर नेटका राहील : सरळ बसून पोटाखाली दोन्ही तळहात ठेवा. या स्थितीत राहात कंबरेतून प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे वळा. हा सतत १ मिनीट करीत राहा. नियमितपणे केल्यास कण्याच्या खालच्या भागात लवचिकपणा येतो व पोश्चरही नेटका राहतो.

कंबर राहील सुडौल : स्टूल वा बिनहाताच्या खुर्चीत बसावे. सरळ बसून कंबरेवर दोन्ही हात ठेवावेत. आता या स्थितीत राहत डावी-उजवीकडे वळायचे आहे. हे सतत १ मिनीट करा. नियमितपणे केल्यास कंबरेच्या आजूबाजूचे स्नायू, तर मजबूत होतीलच. शिवाय पोट व कंबरेची जादा चरबीही कमी होईल.लक्षात ठेवा की, हा करताना पाठीचा कणा एकदम ताठ ठेवायचा आहे. वाकून बसायचे नाही.

पोटाची चरबी कमी होईल : सरळ बसत आपल्या दोन्ही हातांची बोटे एकमेकांत अडकवा. आता कंबरेतून प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे वळा. वळताना हातही वळवायचे आहेत. व्यायाम सतत १ मिनीट करावा.नियमितपणे हा केल्यास पोटाजवळ साचलेली चरबी नष्ट होत असते. लक्षात ठेवा की झटयात न वळता सावकाश आरामात वळायचे आहे.

स्नायूंना मिळेल बळकटी : सरळ बसावे व दोन्ही तळहात डोयावर ठेवावेत. याच स्थितीत राहात कंबरेतून उजवीकडे व नंतर डावीकडे वळा.असे सतत ५० ते ६० सेकंद करा, या व्यायामाने बगलेतील स्नायू मजबूत होतात व खांद्याजवळील जादा चरबीही कमी होते. या व्यायाम रोज १ ते २ मिनिटे करावा.



# मुळ्याची पानं गुणकारी

**मुळ्याच्या पानांमध्ये लोह खूप अधिक प्रमाणात असते.म्हणून त्यांचं सेवन खूप अधिक प्रमाणात करा. यामुळे शरीराची त्वचा मुलायम होते. मुळ्याच्या पानांचा रस पचनक्रियेमध्ये वृद्धी करतो. मुळ्याच्या मऊ पानांवर सैंधव मीठ लावून खाण्याने मुखदुर्गंधी दूर होते.**

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राज्यकर्त्यांवर प्रहार!-माजी मंत्री बच्चू कडू म्हणाले..

## दिव्यांगांसोबत गद्दारी, म्हणजे ईश्वरासोबत गद्दारी!

**जनसंचलन/बुलडाणा**

सत्ताधाऱ्यांनी आजवर दिव्यांगांची अवहेलनाच केलेली आहे. मात्र, प्रहारने दिव्यांगांची चळवळ उभी केली. आजवर माहिती नसलेला पाच टक्के निधी दिव्यांगांच्या पदरात पडत आहे. सात दिवस उपोषण करुन शासनाना मानधनवाढीचा निर्णय घ्यायला भाग पाडलं. मात्र, तेच मानधन सहा हजार रुपये झाल्याशिवाय बच्चू कडू स्वस्थ बसणार नाही. दिव्यांगांसोबत बेईमानी, म्हणजे ईश्वरासोबत बेईमानी, हे राज्यकर्त्यांनी लक्षात घेण्याची गरज असल्याचे सांगत, संघटनेतील कार्यकर्त्यांनाही दिव्यांगांच्या न्याय्य हक्कासाठी तुटून पडा, अशी कठोर ताकीद माजी मंत्री तथा बच्चू कडू यांनी दिली. =प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा.मंत्री बच्चू कडून यांची शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, मेंढपाळ, मच्छीमार हक्क यात्रा ३१ ऑगस्ट रोजी बुलढाणा येथे पोहोचली. स्थानिक जिल्हा परिषदेच्या शिवाजी सभागृहात पार पडलेल्या दिव्यांग मेळाव्यात बोलतांना त्यांनी उपरोक्त प्रतिपादन केले. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष बल्लू जवंजाळ, निलेश वटाने, प्रहार दिव्यांग क्रांतीच्या जयश्री गिते, राजेश पुरी, मुकेश राजपुत, अजित फुंदे, प्रहारचे वैभवराजे मोहिते, उपजिल्हाप्रमुख अजय टप, गजानन लोखंडकार, सुनील वाघ, गणेश काकडे, गणेश जाधव, सोणू वाघ, सुरेश जवंजाळ, नारायण महाले, विष्णु घाडगे, अमोल माळोदे, धिरज सरोदे, सचिन नेमाने, अजय शिंदे, बनकर, राहुल क्षिरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. तिरंगा झेंड्याचे पुजन व वंदन करुन कार्यक्रमास सुरुवात झाली. दिव्यांगांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. तसेच दिव्यांगांच्या प्रश्नांवर एकजुटीने लढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी पुढे बोलतांना बच्चू कडू म्हणाले की, गेल्या पंचवीस वर्षांपासून दिव्यांगांसाठी आपण लढत आहोत. प्रहारमुळे दिव्यांगांना अस्तित्व मिळाले आहे. काही स्वार्थी लोकं समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे. ही लढाई जात, पात, धर्म, पंथाची नसून वेदनेची आहे. दिव्यांगांना त्यांच्या हक्कांसाठी एकत्र येण्याची गरज असून २८ ऑक्टोंबरला मुंबईत होणाऱ्या आंदोलनात जिल्ह्यातील प्रत्येक दिव्यांगाने सहभागी होण्याचे आवाहन करत सहा हजार भेटल्याशिवाय शांत बसणार नाही, असा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्याध्यक्ष बल्लू जवंजाळ, राजेश पुरी, जयश्री गिते यांनी देखील विचार व्यक्त केले. यावेळी जिल्ह्यातील हजारो दिव्यांग बांधवांची विशेषत: दिव्यांग महिलांची उपस्थिती होती. मेळाव्यात दिव्यांगांच्या हितासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेतांना आपण आमदार असतांना एकुण आठ लक्षवेधी लावल्या आणि १८२ शासननिर्णय काढले. तसेच, दिव्यांगांसाठी लढतांना आपल्यावर सुमारे २५० गुन्हे दाखल झाले. संघटनेच्या



अधिक मजबूतीसाठी आणि दिव्यांगांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी कठोर पावले उचलली जातील. पैसे घेणाऱ्यांची लगेच हकालपट्टी केली जाईल. अपंगांसोबत बेईमानी करणाऱ्याला संघटनेत ठेवणार नाही,असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला. संघटना अधिक प्रभावी करण्यासाठी लवकरच नवीन रचना जाहीर केली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्याला तीन जिल्हाप्रमुख देणार आणि संघटन नव्याने उभे करणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. याशिवाय, दिव्यांगांना स्वावलंबी बनवण्यासाठी उद्योग सुरू करण्याचे आवाहन करण्यात आले आणि त्यासाठी लागेल ती मदत करण्याचे आश्वासनही बच्चू कडू यांनी दिले.

# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली ३ आणि ४ सप्टेंबरला दिल्ली येथे राष्ट्रीय आयुष अभियान आणि क्षमता बांधणी संदर्भात शिखर परिषद...




**जनसंचलन/बुलढाणा**

आझादी का अमृत महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टी नेतृत्वाखाली आयुष मंत्रालयाच्या राष्ट्रीय आयुष अभियान आणि राज्यांमध्ये क्षमता बांधणी या विषयावर विभागीय शिखर परिषदेचे आयोजन ३ आणि ४ सप्टेंबरला दिल्ली येथे आयोजीत करण्यात आले आहे अशी माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क झाल्यातून देण्यात आली आहे नवी दिल्ली येथील एआयआयए, सरिता विहार, येथे होणाऱ्या राष्ट्रीय आयुष अभियान आणि क्षमता बांधणी या विषयावरील विभागीय शिखर परिषदे ३ आणि ४ राष्टेबरला केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे . राष्ट्रीय आयुष अभियानाला बळकटी देण्यासाठी, राज्यांची क्षमता वाढविणे आणि राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी या दोन दिवसांची राष्ट्रीय शिखर परिषदेचा उपयोग होणार आहे आयुष शिखर परिषदेत आर्थिक व्यवस्थापन, गुणवत्ता हमी, आयटी आणि बरेच काही यावर चर्चा करण्यासाठी सहा विषयगत उप-गट आयुष एकात्मिकता आणि क्षमता बांधणीवर चर्चा करण्यासाठी वरिष्ठ अधिकारी आणि तज्ञ शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहे
शिखर परिषदेचे उद्दिष्ट राज्य/ केंद्रशासित प्रदेशांकडून आयुर्वे दा संदर्भात प्राप्त होणाऱ्या विषयांवर चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ मिळणार आहे, त्यामुळे तळागाळातील सूचनांचा देखील समावेश केल्या जाणार आहे राष्ट्रीय आयुष मिशन () ला बळकटी देणे आणि धोरणात्मकरित्या विस्तार करणे आहे - आयुर्वेद, योग आणि निसर्गो पचार, युनानी, सिद्ध, सोवा रिग्पा आणि होमिओपॅथी प्रणाली एकत्रित करून समग्र आरोग्यसेवेला प्रोत्साहन देणारा एक प्रमुख कार्यक्रम आहे २०२५ मध्ये झालेल्या चौथ्या मुख्य सचिव परिषदेत पंतप्रधानांनी भर दिलेल्या सहा विषयगत शिखर परिषदांच्या मालिकेतील ही आगामी शिखर परिषद शेवटची आहे. वर्षभर आयोजित होणाऱ्या या शिखर परिषदांमध्ये केंद्र सरकार आणि सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील अधिकाऱ्यांना प्रमुख विषयांवर केंद्रित चर्चा करण्यासाठी एकत्र आणले जात आहे, ज्यामुळे क्षमता बांधणी वाढविण्यासाठी कनिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व स्तरांवर सहभाग वाढणार आहे हे विभागीय शिखर परिषद आयुष प्रणालींना देशाच्या आरोग्यसेवा व्यवस्थेचा अविभाज्य भाग म्हणून प्रोत्साहन देण्याच्या, सुलभता, गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढविण्याच्या भारत सरकारच्या वचनबद्धतेला बळकटी देते. राष्ट्रीय आयुष अभियानाची पूर्ण क्षमता साकार करण्यासाठी राज्य आणि केंद्रशासित प्रदेश पातळीवर क्षमता बांधणीचे महत्त्व अधोरेखित करणारे ठरणार आहे

# मराठा आरक्षण आंदोलनाला डोणगांव कुरेशी समाजाचा हातभार....



**जनसंचलन/डोणगाव**

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील हे सध्या मुंबईतील आझाद मैदान येथे आरक्षणाच्या मागणीसाठी ठामपणे आंदोलन करत आहेत परंतु या ठिकाणी आंदोलनकर्त्यांवर अन्यायकारक पद्धतीने अडचणी निर्माण केल्या जात आहेत.तेथील हॉटेल्स व जेवणाची व्यवस्था बंद पडले आहे आणि आंदोलनकर्त्यांना अडचणीत आणले. अश्या परिस्थितीत आपला मराठा बांधव उपाशी राहू नये या भावनेतून डोणगाव येथील काही मराठा बांधवांनी मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत डोणगांव कुरेशी समाजातर्फे मदतीचा हात पुढे करण्यात आला. या समाजाच्या वतीने फुल नाही पण फ ुलाची पाकळी या भावनेतून ४० किलो चिवडा, दहा बॉक्स बिस्किटे,आणि बिसलेरी पाण्याचे काही बॉक्स,दहा भरणी सोन पापडी हे सगळं काँग्रेस चे नेते नाजीमभाई कुरेशी यांच्या हस्ते आंदोलनातील आयोजक मंडळींना देण्यात आले,तसेच त्यांनी डोणगांव कुरेशी समाजाचे आभार मानले. या उपक्रम मध्ये प्रो.जुबेर सर,रहीम सर कुरैशी, उस्मान भाई कुरैशी, तुकडु( जमील )कुरैशी, कालू कुरैशी, ज़हीर कुरैशी, शकील कुरैशी, शब्बीर कुरैशी, नज़ीर कुरैशी, खालिद कुरैशीअप्पू कुरैशी, यासीन मुन्शी कुरैशी, अमीर कुरैशी, शफीक कुरैशी, लुकमान कुरैशी, मजीद कुरैशी, अल्ताफ कुरैशी, रऊफ कुरैशी, राज़ीक कुरैशी, बशीर कुरैशी, मोहसीन कुरैशी, उस्मान करीम कुरैशी,मलिक कुरैशी, मज़हर कुरैशी, हसन कुरैशी, सलमान कुरैशी, उमर कुरैशी, जमील कुरैशी, वसीम कुरैशी, नसीम कुरैश आदींनी परिश्रम घेऊन पुढाकार घेतला. गावातील नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले असून धर्म-जात न पाहता संकटाच्या वेळी समाजासाठी एकत्र उभे राहणे हीच खरी माणुसकी आहे असे मत व्यक्त केले

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलडाणा नगर परिषदेची प्रभाग रचना नियमबाह्य :- ॲड.जयश्री शेळके

**जनसंचलन/ बुलढाणा**

बुलडाणा महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नगरपरिषदेची प्रभाग रचना करणे अपेक्षित असतानाही बुलडाणा नगर परिषदेने तयार केलेली प्रभाग रचना ही नियमबाह्य व नागरिकांच्या हिताला बाधक असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी केला आहे. या संदर्भात ॲड.जयश्री शेळके यांनी नगर परिषदेकडे लेखी आक्षेप नोंदविला आहे. त्यांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नव्याने सुस्पष्ट, न्याय्य व सुयोग्य प्रभाग रचना जाहीर करण्यात यावी अशी मागणी केली आहे. शासनाच्या आदेशानुसार प्रभाग रचना उत्तर दिशेकडून सुरू करून सलग क्रमाने करणे अपेक्षित होते. मात्र बुलडाणा नगर परिषदेने ही प्रभाग रचना वायव्य दिशेपासून सुरू केली असल्यामुळे भौगोलिक सलगता भंग झाली आहे. नैसर्गिक सीमा जसे की नदी, महामार्ग, रेल्वे मार्ग, प्रमुख रस्ते यांचा विचार न करता प्रभाग ठरवण्यात आल्याने अनेक ठिकाणी विभागणी गोंधळात टाकणारी ठरली आहे. प्रभागांची सीमा नागरिकांना समजेल अशा लँडमार्कऐवजी शेत सर्वे नंबरवर आधारित ठेवण्यात आल्याने प्रभाग रचना अधिकच अस्पष्ट झाली आहे. याशिवाय, विदर्भ हाऊसिंग सोसायटीसारखी एकसंध वस्ती मुद्दाम दोन प्रभागांत विभागण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनुसूचित जाती-जमातींच्या वस्त्यांचे अन्यायकारक विभाजन करून त्यांचे मतदारसंघ हेतुपुरस्सर विभाजित केले असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. लोकसंख्येचे संतुलन न पाळता, नागरिकांच्या सोयीसुविधांचा विचार न करता नगर परिषदेकडून मनमानी पध्दतीने सदर प्रभाग रचना झाल्याचे दिसून येत असल्याचे ॲड. जयश्री शेळके यांनी सांगितले.



ही प्रभाग रचना स्थळ निरिक्षण न करता बसल्या ठिकाणी कागदोपत्री करण्यात आली आहे. नागरिकांचा, मतदारांचा गोंधळ वाढवून विशिष्ट राजकीय पक्षाला, व्यक्तीला फायदा व्हावा या उद्देशाने हेतुपुरस्सरपणे सदरची प्रभाग रचना करण्यात आलेली आहे. सदर प्रभाग रचना रद्द करून शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नव्याने व न्याय्य पद्धतीने प्रभाग रचना करण्यात यावी,फ्फ अशी ठाम मागणी ॲड. जयश्री शेळके यांनी केली आहे.

# नेते पावरफुल पण गावातली बत्ती गुल!

**जनसंचलन/ धामणगाव बढे**

ऑगस्ट महिन्यात सण उत्सवाची रेलचेल असते.या उत्सवा दरम्यान पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन जनजागृती करून कायदा अबाधित राखण्यासाठी प्रयत्नशील असतात.मात्र धामणगाव बढे येथे लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यापैकी पथदिवे बंद असल्याने गावकरी हैराण झाले आहेत. मोताळा तालुक्यातील धामणगाव बढे या गावात पथदिवे बसवण्याची ग्रामस्थांची तातडीची मागणी आहे. गणेशोत्सव आणि ईद मिलादुन नबी यासारखे सण तोंडावर असताना धामणगाव बढे गावातील पथदिवे गेल्या तीन ते चार महिन्यापासून बंद असल्याने ग्रामस्थ अंधारात आहेत. या समस्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असुन माजी सरपंच पती अलीम कुरेशी यांच्या नेतृत्वाखालील ग्रामस्थांनी सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांना या संदर्भात एक निवेदन दिले आहे. निवेदनात सणासुदीच्या काळात तात्काळ पथदिवे सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. सण आले तरी गावात अंधार आहे,यामुळे ये-जा करताना अडचणी येत असून गावकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. निवेदनात घंटागाडी नियमितपणे फिरवण्याची आणि बस स्थानकावरील सार्वजनिक स्वच्छालय, मुतारी घर तातडीने सुरू करण्याची मागणी ही करण्यात आली आहे. गावातील स्वच्छतेसाठी घंटागाडी आवश्यक असून बसस्थानकावरील शौचालय मुतरी सुविधा नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्यांचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे या गंभीर बाबीवर ग्रामपंचायत तत्काळ लक्ष घालून पथ दिवे घंटागाडी आणि शौचालय व मुतारी च्या समस्यांचे निराकरण करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.निवेदन देता वेळी माजी सरपंच पती अलीम कुरेशी व भाजपा जिल्हा उपाध्यक्ष गजानन भाऊ घोंगडे ग्रां.पं सदस्य, जमीर कुरेशी हजर होते.

# मी धावतो वोट चोरी रोखण्यासाठी या कार्यक्रमातील खोटे गुन्हे मागे घ्या..

## बुलढाण्या जिल्ह्यातही मतांची चोरी झाले हे सिध्द झाले : हर्षवर्धन सपकाळ

**जनसंचलन/बुलडाणा**

उलटा चोर कोतवाल को डाटेफ ही म्हण मतचोरीच्या अनुषंगाने सिद्ध होत असल्याचे वारंवार पुरावे मिळात आहे. निवडणूक आयोगाच स्वत : उलटे कांगावे करत आहे. आता लोकशाही वाचवण्यासाठी व आपला संविधान अधिकार जागृत करण्यासाठी मी धावतो वोट चोरी रोखण्यासाठी मॅरेथॉन बुलढाण्या जिल्ह्यात आयोजित करण्यात आली होती. चिखलीत नगरपालिका, पोलीस प्रशासनाची परवानगी असतांनाही सत्ताधारी पक्षाने विचित्र स्वरुपाचे बॅनर लावून वाद निर्माण केला. गणेशउत्सव असतांना सत्ताधारी पक्षाचे आमदार, कार्यकर्ते वाद करत असतील तर त्यांच्यावर गुन्हे दाखल होणे अत्यावश्यक होते. मात्र काँग्रेस पक्षाच्या आयोजकावर उलटे गुन्हे दाखल करण्यात आले. यावरुन हे सिद्ध होते की, देशानंतर जिल्ह्यातही मतांची चोरी झाली हे खरे आहे, असे प्रतिपादन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. मी धावतो वोट चोरी रोखण्यासाठी या शांततामय कार्यक्रमातील खोटे गुन्हे मागे घ्या तसेच कार्यरत ठाणेदार चिखली यांना निलंबीत करा या मागणीसाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी जिल्हा पोलीस अधिक्षकांना निवेदन दिले. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, मी धावतो वोट चोरी रोखण्यासाठी या शांततामय मॅरेथॉनचे काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम हा पूर्णताः अहिंसात्मक, शांततामय व लोकशाही मार्गाने संविधानिक अधिकारांचे पालन करत पार पडला मात्र, अत्यंत खेदाची गोष्ट म्हणजे या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व माजी आमदार राहुल बोंद्रे तसेच इतर १३ काँग्रेस



पदाधिका-यांविरोधात स्फोटक व ज्वालाग्रही पदार्थांनी सरकारी मालमत्तेचे नुकसान केल्याचे खोटे व अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कृती केवळ तथ्यहीन नाही, तर ती लोकशाहीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारी व संविधानाच्या मुल्यांच्या अपमान करणारी आहे. बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे व अन्य काँग्रेस पदाधिकाऱ्यांवर दाखल करण्यात आलेल सर्व खोटे अजामिनपत्र गुन्हे तातडीने मागे घेण्यात यावेत. तसेच सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी. चिखली ठाणेदार यांना निलंबीत करण्यात यावे, अशी मागणी सपकाळ यांनी केली आहे.

# डोणगाव प्राथमिक आरोग्य केंद्रावर उपचार करा!

**जनसंचलन/ डोणगाव**

पावसाळ्यामुळे रोगराईला आमंत्रण मिळत आहे.अशा काळात आरोग्य सेवा तत्पर असायला हवी मात्र डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र आज सुट्टीमुळे बंद असल्याचे सांगितले जात आहे.वास्तविक पाहता आज जिल्हाधिकाऱ्यांनी सुट्टी जाहीर केलेली नाही. आणि या रुग्णालयात डॉक्टर, नर्स यांची अनुपस्थिती आहे.त्यामुळे या प्राथमिक आरोग्य केंद्रावर उपचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मेहकर तालुक्यातील डोणगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे.परंतु येथे समस्यांचा सुकाळ असून, रुग्णांची हेळसांड होत असल्याचा आरोप होतो आहे.आज दवाखाना का बंद आहे? असे विचारल्यावर आज १ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून सुट्टी आहे,असे भ्रमणध्वनीवरून सांगण्यात आले. वास्तविक पाहता आज कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्राला सुट्टी नाही. मात्र डोणगाव प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असल्याने आरोग्य सेवा विस्कळीत झाली असून परिसरातील रुग्णांना नाक त्रास सोसावा लागला आहे.दरम्यान या प्राथमिक आरोग्य केंद्रावरच उपचार करण्याचीगरजआहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८